म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा. वा.
दा. क्र. 32165

# बाल पंचतंत्र ३



BVBK-0403275
BVBK-0403275

क्र. ३२७५ २०।३।८०
विदत बी बी.

# बाल पंचतंत्र

## भाग तिसरा

लेखक
त्र्यंबक पुरुषोत्तम थोरात

BVBK-0403275

BVBK-0403275

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई.

किंमत ३ रुपये

बाल पंचतंत्र

# निवेदन

ज्ञानदान करण्याचे वाङ्मयाचे जे अनेक प्रकार आहेत त्यांत 'कथा किंवा गोष्ट' ह्या प्रकाराला फार वरचे स्थान दिले जाते. हा प्रकार प्राचीन काळापासून आपल्या देशात रूढ आहे. उपनिषदांसारख्या वेदान्दपर ग्रंथांतील गहन तत्त्वे सुलभ रीतीने समजावून देण्यास प्राचीन ऋषींनी गोष्टींचाच आश्रय केलेला आढळतो. महाभारतकारांनीसुद्धा दृष्टान्तांकरता अनेक सुंदर कथा सांगितलेल्या आहेत. बुद्ध, महावीर, ख्रिस्त, महंमद ह्यांसारख्या महान धर्मप्रवर्तकांनी गोष्टींच्याच्व साह्याने आपला उपदेश लोकांच्या मनात ठसविला ह्याची साक्ष त्यांचे ग्रंथच देतात.

बालवाङ्मयात तर गोष्टीला अग्रस्थानच देण्यात आले आहे. कल्पित कथांची मुलांना अत्यंत आवड असते. ह्यामुळे त्यांच्या साह्याने एखादा उपदेश किंवा नीतितत्त्व बालमनावर मनोरंजक रीतीने सहज बिंबविता येते.

संस्कृत वाङ्मयात हितोपदेश व पंचतंत्र हे दोन कथाग्रंथ अत्यंत लोकप्रिय झालेले आहेत. दोन्ही ग्रंथांची रचना एकाच पद्धतीची आहे. एक मोठी कथा घेऊन तींत अनुषंगाने अनेक उपकथा सांगून मूळ तत्त्वाचे स्पष्टीकरण करावयाचे, ही ती पद्धती होय. स्पष्टीकरण करताना ग्रंथकर्त्यांनी अनेक सुभाषिते व व्यवहारांतील नीतितत्त्वे ह्यांचा संग्रह केला. त्यामुळे सदर ग्रंथ अबालवृद्धांस व्यवहारज्ञान शिकविण्यास समर्थ झाले आहेत.

तथापि लहान मुलांच्या मनोधर्माचा विचार केल्यास, त्यांना अवांतर उपदेशापेक्षा सरळ लिहिलेली मूळ कथाच जास्त आकर्षक वाटते. ही मनोवृत्ती लक्षात घेऊन मी पंचतंत्रातील अन्यत्र प्रसिद्ध न झालेल्या अशा काही सुंदर गोष्टी निवडून त्या पाच भागांत लिहिल्या आहेत. त्यांची भाषा शक्य तितकी सुबोध ठेवली असून प्रसंगानुरूप चित्रेही दिली आहेत.

त्र्यं. पु. थोरात

© केशव भिकाजी ढवळे

पुनर्मुद्रण : एप्रिल १९९५

लेझर टाइपसेटिंग दि विझिविग, श्रीसमर्थ सदन, गिरगाव, मुंबई ४

मुद्रक
स ग परुळकर
जस्मिन आर्ट
वडाळा उद्योग भवन
वडाळा, मुंबई ३१

प्रकाशक
ज्योती धनंजय ढवळे
केशव भिकाजी ढवळे
पहिली भटवाडी
गिरगाव, मुंबई ४


# खरोखरीच गाढव

एका रानात एक सिंह राहात होता. त्याच्या बरोबर एक कोल्हाही राहात असे. त्या सिंहाची एकदा एका हत्तीशी मोठी लढाई झाली. त्या लढाईत त्याचे अंग जागोजागी ठेचले गेले. त्या दु:खामुळे तो अगदी बेजार झाला व शिकार करण्याचीही शक्ती त्यास राहिली नाही.

सिंहाची अशी स्थिती झाल्यामुळे कोल्ह्याचीही उपासमार होऊन तो अगदी रोड होऊन गेला. एके दिवशी तो सिंहास म्हणाला, 'धनीसाहेब उपासमारीने मी अगदी अशक्त झालो आहे, त्यामुळे माझ्या हातून आपली सेवा कशी होईल याची मला काळजी वाटते.'

सिंह कोल्ह्याला म्हणाला, 'तू एखादा प्राणी माझ्यापुढे आणलास तर अशाही स्थितीत मी त्याला ठार करू शकेन!'

हे ऐकून कोल्हा प्राण्याचा शोध करण्यासाठी निघाला. एका नदीच्या काठी एक गाढव चरत असलेला त्याला दिसला. त्याच्यापुढे जाऊन कोल्होबा म्हणाले, 'नमस्कार मामा. आपली फार दिवसांनी भेट झाली. मामा असे रोड कशाने झालात?'



गाढव म्हणाला, 'बाळा, माझा धनी फार दुष्ट आहे. तो माझ्याकडून मरेपर्यंत काम करून घेतो; पण खायला एक मूठभरसुद्धा गवत घालीत नाही. मग माझी हाडे न निघतील तर काय बरे होईल?'

कोल्हा म्हणाला, 'अरेरे! मामा, तुमची दशा पाहून मला फार वाईट वाटते. तुम्ही माझ्याबरोबर येता का? आम्ही राहातो तेथे नदी किनाऱ्यावर खूप गवत उगवले आहे. तेथे तुम्ही आलात तर, चारापाण्याची कधीही पंचाईत पडणार नाही.'

गाढव म्हणाला, 'पण काय रे, तेथे रानटी पशू राहात असणार! त्यांपैकी एखाद्याने मला ठार मारले म्हणजे सर्वच आटोपले.'

कोल्हा म्हणाला, 'छे, छे, मामा, तेथे आमचेच राज्य आहे. तेथे रानटी पशू येत नाहीत. शिवाय तेथे नुकत्याच दोन गाढवी परटांच्या त्रासाला कंटाळून

येऊन राहिल्या आहेत. त्या दोघी मायलेकी अशा गुटगुटीत झाल्या आहेत की विचारू नका. त्या मुलीचे लग्न करावयाचा आईचा विचार आहे. तेव्हा मामा, तुम्ही तेथे आलात तर तीही सोय जमविता येईल.'

कोल्ह्याच्या भाषणाने गाढव भुलला व त्याच्याबरोबर ताबडतोब निघाला. कोल्ह्याने गप्पा मारीत त्याला सिंहापुढे नेऊन उभे केले; परंतु सिंहाने त्याच्यावर झटकन् झडप घातली नाही व गाढव त्याच्या हातून निसटून पळून गेला.

सिंहाने शिकार घालविली म्हणून कोल्हा रागाने त्याला फार टाकून बोलला; पण सिंहाने ते मुकाट्याने ऐकून घेतले. नंतर कोल्हा म्हणाला, 'झाले ते झाले, आता पुनः मी त्या गाढवाला घेऊन येतो. तुम्ही अगदी तयार राहून त्याला एकदम् ठार करा.'

असे म्हणून कोल्हा पुन्हा त्या गाढवाकडे गेला व म्हणाला, 'मामा, तुम्ही असे हो काय केलेत? ती नवरी तुमच्याकडे धावत आली असता तुम्ही भलतीच कल्पना करून घाबरून पळून काय गेलात? तिने तुमच्या हातात घालण्याकरता हात पुढे केला तर तुम्हाला वाटले, ती मारतेच आहे. आता ती तुमच्या नावाने जीव द्यावयास तयार झाली आहे. ते पातक तुमच्या माथी बसेल. तेव्हा तुम्ही परत चला.'

कोल्ह्याच्या ह्या भाषणाने गाढवाला पुन: आशा सुटली आणि तो कोल्ह्याबरोबर परत गेला. तो सिंहाजवळ पोहोचताच सिंहाने त्याला ठार केले.

बाल पंचतंत्र : ३

गोष्ट दुसरी

## कोल्हा तो कोल्हाच

एका रानात सिंहाचे एक जोडपे राहात असे. सिंहिणीला दोन पिले झाली, तेव्हा सिंह तिची फार काळजी घेऊ लागला. तो रोज तिला नवीन नवीन पशू मारून आणून देत असे. एके दिवशी संध्याकाळपर्यंत सिंहाला मुळीच शिकार मिळाली नाही. शेवटी घरी परत येताना वाटेत त्याला एक कोल्ह्याचे पिलू सापडले. ते त्याने तोंडात धरून जिवंत घरी आणले व सिंहिणीपुढे ठेवून तो म्हणाला, 'आज तुला ह्याच्यावरच आपली भूक भागवून घेतली पाहिजे; कारण मला दुसरा एकही पशू मिळाला नाही.'

सिंहिणीला त्या कोल्ह्याच्या पोराविषयी मनात इतके प्रेम उत्पन्न झाले की, तिने त्याला न मारता आपला तिसरा मुलगाच मानले व आपल्या दोन पिलांबरोबर त्याचेही चांगले पालनपोषण केले.


याप्रमाणे ते कोल्ह्याचे पोर त्या सिंहाच्या पिलांबरोबर वाढू लागले. ते सिंहिणीच्या अंगावर दूध पीत असे व तिच्या दोन पिलांबरोबर इकडे तिकडे बागडत असे. ती सिंहाची पिले त्याला आपला मोठा भाऊ मानीत असत.

एके दिवशी ते तिघे रानात खेळत असताना त्या बाजूला एक रानहत्ती फिरत फिरत आला. त्याला पाहाताच सिंहाचे छावे गुरगुरून त्याच्या अंगावर धावून जाऊ लागले. ते पाहून कोल्ह्याचे पोर ओरडून म्हणाले, 'बाबांनो, हत्ती हा तुमच्या कुळाचा शत्रू आहे. त्याच्या समोर जाऊ नका!'

वडील भाऊ भयाने आपणास बोलावत आहे असे पाहून ते सिंहाचे छावे नाउमेद झाले व त्याच्या मागोमाग घरी गेले.

त्यांनी वडील भावाच्या भित्रेपणाची हकीगत आपल्या वडिलांस सांगितली. त्याबरोबर ते कोल्ह्याचे पोर रागाने लाल झाले व सिंहाच्या पोरांची खरडपट्टी काढू लागले. तेव्हा सिंहीणीने त्याला एकीकडे नेले. व म्हटले, 'बाळा, आपल्या धाकट्या भावांना असे बोलू नये, त्यांना काही समजत नाही.'

त्यावर कोल्ह्याचे पोर फुशारकीने म्हणाले, 'मी त्यांच्यापेक्षा कोणत्या गुणाने कमी आहे, म्हणून ते



माझी अशी हेटाळणी करतात? ह्या माझ्या अपमानाबद्दल मी त्यांना शिक्षा केल्याशिवाय राहाणार नाही.'

तेव्हा सिंहिणीने त्याला मूळपासूनची हकीगत सांगून म्हटले, 'तुझ्या कोल्ह्याच्या कुळात कधी कोणी हत्तीला मारण्याचा पराक्रम केला आहे काय? कोल्हा तो कोल्हा व सिंह तो सिंह! तेव्हा तू कोल्हा आहेस हे माझ्या पोरांना कळण्यापूर्वीच तू येथून निघून जा. नाहीतर त्यांच्या हातून फुकट प्राणास मुकशील!'

हे तिचे भाषण ऐकताच ते कोल्ह्याचे पोर क्षणात तेथून निघून गेले.

वाचनालय

बाल पंचतंत्र : ३

गोष्ट तिसरी

# मूळ स्वभाव जाईना

शाकलायन नावाचे मुनी एकदा नदीवर स्नानासाठी गेले होते. तेथे एका बहिरी ससाण्याने एका उंदरीला उचलून नेलेले त्यांना दिसले. तेव्हा त्यांना दया येऊन उंदरीला सोडविण्यासाठी त्यांनी ससाण्याला एक दगड मारला. तो त्याला लागून तो बेशुद्ध होऊन खाली पडला व त्याच्या तोंडातील ती उंदरी सुटली; परंतु ती भीतीने गांगरून जाऊन 'माझे रक्षण करा' असे म्हणत मुनींच्या पायाशी येऊन पडली.

इतक्यात बहिरी ससाणा सावध होऊन मुनींजवळ आला व उंदरी मागू लागला. तेव्हा मुनी म्हणाले, 'दुष्ट पक्ष्या, प्राण्यांचे रक्षण करणे हा धर्म आहे. तो सोडून तू ह्या उंदरीला मारू पाहातोस, तेव्हा तुला मूर्खच म्हटले पाहिजे.'

त्यावर ससाणा म्हणाला, 'मुनी महाराज, ज्याप्रमाणे तुम्हा मानवांची उपजीविका अन्नावर होते, त्याप्रमाणे आमची उपजीविका उंदरांसारख्या लहान प्राण्यांवर होते. ही देवाचीच योजना आहे. असे असता तुम्ही मला उगाच दोष का देता! तेव्हा तुम्ही मला ती उंदरी द्यावी हेच उत्तम.'

मुनी म्हणाले, 'ज्या अर्थी ती माझ्या आश्रयाला आली आहे, त्या अर्थी तिचे रक्षण करणे हे माझे कर्तव्य आहे; म्हणून ती तुला मिळणार नाही. तू चालता हो, नाहीतर मी शाप देऊन तुझे भस्म करीन.' ते ऐकताच ससाणा ताबडतोब निघून गेला.

नंतर मुनींनी त्या उंदरीला मुलीचे रूप दिले व आपल्या आश्रमात नेले. घडलेली हकीगत आपल्या बायकोला सांगून ते म्हणाले, 'मी हिला आपली मुलगी मानले आहे. तेव्हा तूही हिचा मुलीप्रमाणेच सांभाळ कर.'

मुनींच्या बायकोने ते कबूल केले. ती मुलगी आनंदाने राहू लागली व आईबापांची सेवा करू लागली. काही वर्षांनी ती लग्नास योग्य झाली, तेव्हा मुनी तिच्याकरता वर शोधू लागले.

मुलाचे कुल, शील, आईबाप, विद्या, पैसा, आरोग्य आणि वय ह्या सात गोष्टी पाहून वर पसंत करावा

असे शहाणे लोक म्हणतात. त्यास अनुसरून मुनींनी सूर्याला बोलावले व मुलीला विचारले, 'हा नवरा तुला आवडतो का?'

मुलगी म्हणाली, 'बाबा, हा तर जवळ येईल त्याला जाळून टाकील. हा नाही मला पसंत! ह्याच्यापेक्षा दुसरा चांगला वर आणा.'

सूर्य म्हणाला, 'मेघ माझ्यापेक्षाही बलवान आहे; कारण तो मला झाकून माझे तेज नाहीसे करतो. तेव्हा तुम्ही त्याला बोलवा.'

मग मुनींनी मेघाला बोलावले व सांगितले, 'मेघा, तू सूर्यापेक्षा बलवान आहेस; तेव्हा तू माझ्या मुलीशी लग्न कर.'

मेघ म्हणाला, 'महाराज, वायूपुढे माझे काही चालत नाही. तो मला केव्हाच पळवून लावतो. तेव्हा तुम्ही त्याला बोलवावे.

लागलीच मुनींनी वायूला बोलावून म्हटले, 'माझ्या मुलीला सर्वांत जास्त बलवान नवरा पाहिजे आहे. तुझ्यापेक्षा जास्त बलवान कोणी आहे काय?'

वायू म्हणाला, 'माझ्यापेक्षा पर्वत श्रेष्ठ आहे; कारण मला तो सहज अडवून धरू शकतो.'

तेव्हा मुनींनी पर्वताला बोलावले व मुलीला विचारले, 'हा तरी तुला पसंत आहे काय?'



मुलगी म्हणाली, 'हा फार प्रचंड व याचे अंगही फार टणक आहे. हा नको मला नवरा!'

मुनींनी पर्वताला विचारले, 'तुझ्यापेक्षा शक्तिवान दुसरा कोणी आहे काय?'

पर्वत म्हणाला, 'अहो, माझा देह एवढा टणक आहे पण तो सुद्धा जो पोखरतो तो उंदीर माझ्यापेक्षा जास्त शक्तिवान म्हटला पाहिजे.' ते ऐकून मुनींनी उंदराला बोलावून आणले. त्याला पाहाताच उंदरीला फार आनंद झाला! ती म्हणाली, 'बाबा, हा नवरा मला पसंत आहे. हा माझ्याच जातीचा असल्यामुळे ह्याच्याशी मी सुखाने संसार करीन.'

मुनींनी लागलीच तिला उंदरी बनवून तिचे उंदराशी लग्न लावून टाकले.

# आंधळे अनुकरण

मणिभद्र नावाचा एक व्यापारी होता. तो मोठा धार्मिक व दानशूर होता; त्यामुळे लोकांत त्याला मोठा मान मिळत असे. काही काळाने त्याचा सर्व पैसा संपला व त्यास गरिबी आली. त्याबरोबर पूर्वीचेच मित्र त्याला विचारीतनासे झाले. 'एक पैसा नसला म्हणजे उत्तम गुणसुद्धा मातीमोल ठरतात!'

या स्थितीबद्दल अतिशय दु:ख होऊन त्याने उपास करून मरण्याचा निश्चय केला व तो झोपी गेला. त्या रात्री स्वप्नात त्याला एक बुद्ध भिक्षू दिसला. तो त्याला म्हणाला, 'शेटजी, असा वैताग करू नका. मी तुमच्या वाडवडिलांनी साठवून ठेवलेला पैशाचा ठेवा आहे. उद्या सकाळी मी ह्याच वेषात तुमच्याकडे येईन. त्या वेळी एक काठी घेऊन ती माझ्या डोक्यात मारा म्हणजे मी सोन्याचा पुतळा होऊन पडेन. त्याचा उपयोग करून तुम्ही वाटेल तितका दानधर्म करा. तुम्हाला कधीही पैशाची उणीव पडणार नाही.'

व्यापारी सकाळी उठला. त्याला स्वप्नाची आठवण होती; परंतु त्यावर त्याचा विश्वास बसेना. तो म्हणाला, 'जे मनी वसे तेच स्वप्नी दिसे. माझ्या नशिबी पैसा असता तर असलेला पैसा खलासच का होता?'

असा विचार करीत तो बसला होता, इतक्यात् तो स्वप्नातला भिक्षू त्याच्यापुढे येऊन उभा राहिला. तेव्हा स्वप्नाची प्रचिती पाहाण्याकरता त्याने एक काठी त्या भिक्षूच्या डोक्यात मारली! त्याबरोबर तो सोन्याचा पुतळा होऊन पडला. शेटजींनी तो उचलून आपल्या खोलीत नेऊन गुप्त ठिकाणी ठेवून दिला.

त्याच वेळी शेटजींच्या घरी एक पाहुणा आला होता. त्याने तो प्रकार पाहिला होता. म्हणून शेटजींनी त्याला थोडेसे द्रव्य दिले व बाहेर बोभाटा न करण्याविषयी बजावून सांगितले.

त्या पाहुण्याला वाटले, ही श्रीमंत होण्याची युक्ती चांगली आहे. आपणही ती करून श्रीमंत व्हावे, असे मनाशी ठरवून तो घरी गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी तो गावातल्या बुद्ध भिक्षूंच्या मठात गेला व तेथील मुख्य भिक्षूंची प्रार्थना करून त्याने त्यांना आपल्या घरी शिष्यमंडळींसह भोजनास येण्याची विनंती केली.

तो मठाधिपती म्हणाला, 'आम्हाला असे आमंत्रण घेऊन भोजनास जाता येणार नाही. आम्ही भिक्षू

आहो.' तेव्हा पाहुणा म्हणाला, 'महाराज, आपणास भोजनासाठी येणे शक्य नसेल तर माझा आग्रह नाही; पण माझ्याजवळ काही उत्तम ग्रंथ व पोथ्या आहेत, त्या आपणास बोलावून आदरसत्काराने द्याव्यात अशी माझी इच्छा आहे. त्या घेण्याकरता तरी आपण उद्या माझ्या घरी येण्याची कृपा करावी.'

मठाधिपतीने ती गोष्ट कबूल केली व दुसऱ्या दिवशी जाण्याचे ठरवले.

पाहुण्याने शहरातील एका मोठ्या घरात जागा घेतली व भिक्षू आल्यावर काय करायचे त्याची सर्व सिद्धता करून ठेवली. नंतर ठरल्या वेळी तो त्यांना बोलावण्यासाठी त्यांच्या मठात गेला. तेव्हा ते सर्व भिक्षू मोठ्या आनंदाने त्याच्या घरी गेले.

ते सर्वजण घरात आल्यावर पाहुण्याने दार लावून घेतले व हातात एक मोठी काठी घेऊन भिक्षूंच्या डोक्यावर तडाखे मारण्यास सुरुवात केली. त्यामुळे कित्येक मरून पडले. कित्येकांची डोकी फुटून ते मोठमोठ्याने ओरडू लागले. तो ओरडा ऐकून लोक जमा झाले व शहराचे रखवालदारही येऊन दाखल झाले. दार फोडून ते आत गेले व झालेला सर्व प्रकार पाहून त्यांनी पाहुण्याला कैद केले व न्यायाधिशापुढे नेऊन उभे केले.



न्यायाधिशाने चौकशी केली तेव्हा पाहुण्याने मणिभद्र व्यापाऱ्याच्या घरी पाहिलेली गोष्ट सांगितली. न्यायाधिशाने मणिभद्रला बोलावून जबाब विचारला. शेटजींनी सर्व खरी हकीगत सांगितली. तेव्हा न्यायाधीश म्हणाला, ‘कोणत्याही गोष्टीचे मर्म न समजता जो केवळ आंधळे अनुकरण करतो त्याचा नाश होतो.’ असे म्हणून त्याने पाहुण्याला फाशीची शिक्षा दिली.

❀ ❀ ❀

समाप्त

❀ ❀ ❀

BVBK-0403275
BVBK-0403275